# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

दूरध्वनी क्र.
०२०–२५६२१०४९
ई–मेल
iqac@unipune.ac.in

गणेशखिंड, पुणे ४११००७
अंतर्गत गुणवत्ता सिध्दता कक्ष

संदर्भ क्र.:आयक्यूएसी / 212

दि :– 10 AUG 2020

अत्यंत महत्वाचे

प्रति,
मा.प्राचार्य / संचालक / विभागप्रमुख,
संलग्न महाविद्यालये / मान्यताप्राप्त परिसंस्था / विद्यापीठ शैक्षणिक विभाग,
प्रस्तुत विद्यापीठ.

**विषय :– 'शैक्षणिक आणि संशोधन समन्वयक' (Academic and Research Coordinator) यांची माहिती ऑनलाईन पध्द्तीने सादर करण्याबाबत.**

महोदय / महोदया,

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठांतर्गत संशोधन प्रकल्प योजना (**ASPIRE**), विद्यार्थ्यांसाठी संशोधन स्पर्धा (आविष्कार, अन्वेषन) यासारखे उपक्रम राबविले जातात. सदर योजना / उपक्रमांची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठी प्रत्येक वर्षी बहुतांष महाविद्यालये / परिसंस्था / विद्यापीठ शैक्षणिक विभागामधील एका अध्यापकाचे 'शैक्षणिक आणि संशोधन समन्वयक' (**Academic and Research Coordinator**) म्हणून नामनिर्देशन करण्यात येते. त्याअनुषंगाने शैक्षणिक वर्ष २०२०–२१ साठी महाविद्यालये / परिसंस्था / विद्यापीठ शैक्षणिक विभागामधील एका अध्यापकाचे 'शैक्षणिक आणि संशोधन समन्वयक' (**Academic and Research Coordinator**) म्हणून नामनिर्देशन करण्यासाठी **ऑनलाईन लिंक** दिनांक ३१ ऑगस्ट, २०२० पर्यंत सुरू असणार आहे.

तरी खालील नमूद केल्याप्रमाणे शैक्षणिक व संशोधन समन्वयकांचे नाव दिनांक ३१ ऑगस्ट, २०२० पर्यंत **ऑनलाईन** पध्द्तीने सादर करावे.

१. ज्या महाविद्यालय / परिसंस्था / विद्यापीठ शैक्षणिक विभागामधील पूर्णवेळ अध्यापकास यापूर्वीच 'शैक्षणिक व संशोधन समन्वयक' (**ARC**) म्हणून नामनिर्देशित केलेले आहे. त्यांची सुध्दा माहिती **ऑनलाईन** पध्दतीने सादर करावी.

२. तसेच, ज्या महाविद्यालय / परिसंस्था / विद्यापीठ शैक्षणिक विभागामधील अध्यापकाचे अद्याप 'शैक्षणिक व संशोधन समन्वयक' (**ARC**) म्हणून नामनिर्देशन केलेले नाही, त्यांनी सदरचे नामनिर्देशन करून त्यांची माहिती **ऑनलाईन** पध्दतीने सादर करावी.

**ऑनलाईन** पध्द्तीने माहिती सादर करण्याची लिंक खालीलप्रमाणे आहे.
**http://bcud.unipune.ac.in/root/login.aspx ➡ College/Department login ➡ Nomination for ARC**

कळावे,

आपला,

(मु.वि.रासवे)
उपकुलसचिव
अंतर्गत गुणवत्ता सिध्दता कक्ष
(अतिरिक्त कार्यभार)